


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ८ मे १९४६ अंक १९

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
| --- | --- | --- |
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
| --- | --- |
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बॅंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

ब्रिटिश शास्त्रज्ञास शिक्षा—डॉ. मे ह्या ब्रिटिश शास्त्रज्ञानें अज्ञात मनुष्यास ॲटम बाँब-संबंधीं संशोधनाची माहिती पुरवली ह्या आरोपावर त्यास १० वर्षांची शिक्षा देण्यांत आली. माहितीचे मोबदल्यांत, कांहीं डॉलर व व्हिस्कीची बाटली प्रोफेसर मजकुरांना मिळाली.

रेडी डिलिव्हरी कॉन्ट्रॅक्टः—डिफेन्स ऑफ इंडिया रूल ९४-७ मध्यें रेडी डिलिव्हरी कॉन्ट्रॅक्टची व्याख्या सांगितली आहे, ती हिंदुस्थान सरकारनें आतां दुरुस्त केली आहे. कराराच्या तारखेपासून सातव्या दिवसाचें आंत स्टॉक एक्सचेंजमधील करार पुरे करण्यांत आले पाहिजेत, असा आजचा कायदा होता. आतां साताचे पंधरा दिवस करण्यांत आले आहेत.

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या—हिंदुस्थानांत मार्च, १९४६ अखेर १६ एक्सचेंज बँका व ७८ इतर शेड्यूल्ड बँका होत्या. त्या सर्वांच्या मिळून ३,००३ कचेऱ्या होत्या. ३१ मार्च, १९४६ अखेरच्या तिमाहींत शेड्यूल्ड बँकांनीं ८३ नव्या कचेऱ्या काढल्या व ४ चालू कचेऱ्या बंद केल्या. ह्या नव्या ८३ कचेऱ्यांची प्रांतवार वाटणी खालीलप्रमाणें आहेः—पंजाब १२, मद्रास १८, ब्रह्मदेश १०, संयुक्त प्रांत ११, बंगाल ७, मुंबई ७, दिल्ली २, मध्यप्रांत ३. बाकीच्या इतर प्रांतांत. एकूण ३,००३ कचेऱ्यांपैकी एकट्या इंपीरिअल बँकेच्या कचेऱ्या ४३४ आहेत.

सहकारी शिक्षणाच्या सोईत वाढ—सहकारी शिक्षणाच्या सध्याच्या स्थितीचें अवलोकन करून, त्या शिक्षणाच्या वाढत्या गरजांचें दृष्टीनें त्यांत सुधारणा सुचविण्यासाठीं मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. सर जनार्दन मदन हे तिचे अध्यक्ष असून श्री. आर. जी. सरय्या, प्रा. द. गो. कर्वे व मि. एस. एम. इक्रम रजिस्ट्रार हे तिचे सभासद आहेत. मि. इक्रम हे कमिटीचे सेक्रेटरी म्हणूनही काम करतील.

त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि.—मेसर्स ओगले बदर्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीचा कारखाना १९४५ सालीं फक्त सात महिने काम करून व ४ लक्ष रुपयांचें उत्पादन करूं शकला. कंपनीस ८१,२०६ रुपये निव्वळ नफा उरला ६¼% डिव्हिडंड देण्यास ३१,२५० रुपये लागतील.

मुंबई विधिमंडळ—मुंबई प्रांताच्या नव्या असेंब्लीचें पहिलें अधिवेशन २० मे रोजीं मुंबई येथें सुरू होईल. कौन्सिलच्या कामास २३ मे रोजीं प्रारंभ होईल.

अमेरिकेंत एका वर्षांत २९,२३६ पेटंट्स—अमेरिकेच्या पेटंट कचेरीनें १९४५ सालीं अमेरिकन नागरिकांस २७,१२८ पेटंट्स दिलीं. अमेरिकेंतील परदेशीय लोकांना २,११२ पेटंटस देण्यांत आलीं. ह्या परदेशी लोकांची इंग्लंड ९०५, कॅनडा २५५, जर्मनी २४३, (ह्यावर एलिअन प्रापर्टी कस्टोडिअनचा ताबा आहे) स्वित्सरलंड २१२ व स्वीडन ११७ अशी देशवार वाटणी आहे.

प्रांतिक मंत्र्यांचा पगार—मुंबई प्रांताच्या मंत्र्यांचा मासिक पगार ७५० रुपये ठरविण्यांत येणार आहे. प्राप्तीवरील कर सरकार भरील.

















फाऊंटन पेनकरितां
लोटस
शाई
सर्वत्र मिळते.




पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,






# पॅलेस्टाइन चौकशीचा रिपोर्ट

पॅलेस्टाइन चौकशी कमिटीचा अहवाल गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झाला, त्यामुळें पॅलेस्टाइन येथील ज्यू-अरब प्रश्न मिटण्यास किती सहाय्य होईल हें सांगणें कठीण आहे. अमेरिकन व ब्रिटिश सरकारांनी ही चौकशी कमिटी नेमिली होती आणि पॅलेस्टाइन-मधील राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचें निरीक्षण करून ज्यू लोकांना तेथें कितपत वाव आहे ह्यासंबंधी तिने सूचना करावयाच्या होत्या. युरोपांतील ज्यू लोकांना नाझींच्या हातून सोसावा लागलेला छळ लक्षांत घेऊनच कमिटीने आपल्या शिफारसी केलेल्या आहेत.

पॅलेस्टाइनखेरीज इतर कोणत्याहि देशांत ज्यू लोकांना वसाहत करण्यास फारसें सहाय्य मिळण्याजोगें नाहीं असें कमिटीस आढळून आलें. परंतु एकटें पॅलेस्टाइन सर्व ज्यू निर्वासितांना पुरें पडणार नाहीं, ह्यासाठीं त्यांच्या प्रश्नाकडे सबंध जगानें लक्ष पुरविलें पाहिजे, असें कमिटीचें म्हणणें आहे. बहुसंख्य ज्यू लोक युरोपांतच राहतील, त्यांच्या बाबतींत भेदाभेद केला जाणार नाहीं अशी अँग्लो-अमेरिकन राष्ट्रांनीं खबरदारी घेतली पाहिजे. १९४६ मध्यें १,००,००० ज्यू लोकांना पॅलेस्टाइनमध्यें प्रवेश मिळूं द्यावा अशी कमिटीची महत्त्वाची शिफारस आहे. "पॅलेस्टाइनखेरीज इतरत्र कोठेंहि त्यांचें स्वागत केलें जाणार नाहीं" असें कमिटी म्हणते!

पॅलेस्टाइनवर एकट्या ज्यू लोकांचाहि अधिकार नाहीं व एकट्या अरब लोकांचाहि अधिकार नाहीं हें एकदा कायमचें ठरवून टाकण्यासाठी खालील तत्त्वें स्पष्टपणें जाहीर करण्यांत यावीं असें कमिटीनें सुचविलें आहे :—

(१) पॅलेस्टाइनमध्यें अरबांचेवर ज्यू व ज्यूंचेवर अरब सत्ता चालवूं पहाणार नाहींत.

(२) पॅलेस्टाइन हें ज्यू राष्ट्र किंवा अरब राष्ट्र दोन्हींपैकी कांहींहि राहणार नाहीं.

(३) स्थापन केलें जाणारें सरकार आंतरराष्ट्रीय हमीने ख्रिस्ती, मुसलमान व ज्यू धर्माचे हितसंबंध सुरक्षित राखील.

संख्याबळानें कोणास सत्ता मिळावी हें ठरविणें घातुक आहे, कारण संख्याबळ वाढविण्यासाठी ज्यू व अरब दोघेहि प्रयत्न करीत आहेत. ज्यू-अरब तेढ नाहींशी होईपर्यंत पॅलेस्टाइनचें मँडेट सध्याप्रमाणेंच चालू रहावें व संयुक्त राष्ट्रांच्या योजनेप्रमाणें त्याचा पुढें विश्वस्त करार व्हावा अशी कमिटीची कल्पना आहे. सर्व संयुक्त राष्ट्रांनीं पॅलेस्टाइन प्रकरणाची जबाबदारी पत्करली पाहिजे, असा कमिटीचा आग्रह आहे. अरबांचें राहणीचें मान व शैक्षणिक दर्जा ज्यूंच्या बरोबरीचा व्हावा असा प्रयत्न करण्यांत यावयाचा आहे. ज्यू व अरब ह्यांचेकडून वसूल होणाऱ्या करांचा विनियोग मुख्यत: अरबांच्या उद्धाराकडे करण्याची आवश्यकता कमिटीनें स्पष्ट केली आहे. अरबांपेक्षा ज्यू लोकांना कमिटीच्या शिफारसी जास्त अनुकूल आहेत, हें कमिटीनें स्वतःच मान्य केलेलें दिसतें. कारण, मँडेटरी सत्तेशीं ज्यू लोकांनीं हार्दिक सहकार्य करून नव्यानें येणाऱ्या ज्यू लोकांचा मार्ग सुकर करावा, असें कमिटीने सुचविलें आहे.

पॅलेस्टाईनचें प्रकरण हें फार जुनें व चिघळलेलें प्रकरण आहे. जुन्या राष्ट्रसंघाने ग्रेटब्रिटनकडे १९२२ सालीं मँडेट ह्या नात्याने व्यवस्था दिली तेव्हांपासून ब्रिटिश हायकमिशनर तेथील कारभार पहातो. एकूण सुमारें १० लक्ष लोकसंख्येपैकी ७½ लक्ष मुसलमान, १½ लक्ष ज्यू व १ लक्ष ख्रिस्ती आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी रोमन साम्राज्यांत पॅलेस्टाइनचा समावेश झाला तेव्हांपासून पॅलेस्टाईनमध्यें स्थाईक होण्याचा ज्यू लोकांचा प्रयत्न चालू आहे आणि अद्याप तो यशस्वी झालेला नाहीं. आपल्या पूर्वजांची भूमि परत मिळविण्याचा त्यांचा निर्धार कायम राहिला आहे. ज्यू लोकांना पॅलेस्टाईन मिळवून देण्याचे आजवर कित्येक प्रयत्न झाले त्यांत ग्रेट ब्रिटनने पुष्कळ पुढाकार घेतला, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. तुर्कांकडून पॅलेस्टाईन घेतल्यानंतर गेल्या महायुद्धाचे वेळीं ज्यू लोकांच्या आकांक्षा सफळ होण्यास संधि मिळाली. सुप्रसिद्ध "बाल्फर डिक्लरेशन"नें ज्यू लोकांचें पॅलेस्टाईनमध्यें "घर" स्थापण्यास ग्रेट ब्रिटनला बांधून घेतलें. परराष्ट्रमंत्री लॉर्ड (तेव्हां मि.) बाल्फर ह्यांच्या घोषणेप्रमाणें पॅलेस्टाईन मँडेटची योजना करण्यांत येऊन राष्ट्रसंघानें त्यास मान्यता दिली.

"तुर्की अमदानींत अरबांना जें स्वातंत्र्य मिळालें नाहीं, तें आतां मिळेल, त्यांचा आर्थिक उद्धार होईल, ब्रिटिश धोरण अरबांच्या प्रगतीस पोषकच आहे" असें अरबांना सांगण्यांत आलें तें त्यांना कधींच पटलें नाहीं व ज्यू लोकांची पॅलेस्टाइन-मधील वाढती आयात त्यांस पसंत नव्हती. ज्यू लोक अरबांपेक्षां पुढारलेले व पैसेवाले असल्याकारणाने अरबांस त्यांच्या स्वतःच्या भवितव्याबद्दल सहाजिकच भीति वाटत होती. ज्यू आणि अरब ह्या दोघांसही खूष करण्याचें अवघड काम ग्रेट ब्रिटनने पत्करलें होतें व ज्यू लोकांस पाठिंबा देऊन अरबांना शक्य तों कमी नाखूष करण्याची कसरत त्याने आजवर केली. अँग्लो-अमेरिकन कमिटीनें पॅलेस्टाईनसंबंधीं कांहींतरी कायम स्वरूपाचा निर्णय सुचवून तो प्रश्न निकालांत निघण्यास सहाय करावें, अशी अपेक्षा होती ती फोल ठरली आहे. तात्काळ १,००,००० ज्यू लोकांना प्रवेश मिळूं द्यावा व मागाहूनहि पॅलेस्टाईनच्या (ब्रिटिश) सरकारनें अधिक ज्यू लोकांना योग्य अटींवर येऊं द्यावें ही कमिटीची सूचना अरबांना पसंत पडणें अशक्य आहे. पॅलेस्टाईनवर लादण्यांत यावयाची ज्यू लोकांची संख्या जोंपर्यंत अमर्यादित आहे तोंवर अरबांचें समाधान कसें होणार? कमिटीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीची जबाबदारी एकटें ब्रिटन घेण्यास तयार नाहीं. अमेरिकेचा व संयुक्त राष्ट्रांचा पाठिंबा त्यास हवा आहे याचें कारण उघडच आहे.

---

**वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि.**—वरील आगपेट्यांच्या कंपनीने १९४५ सालीं ९ कोटि रुपयांच्या उत्पादनाची विक्री केली, निवळ नफा ५० लक्ष रुपये उरला. कंपनीने सरकारला ४½ कोटि रुपये एक्साइज ड्यूटी भरली, म्हणजे विक्रीच्या किंमतीच्या निम्म्याइतकी ती ड्यूटी आहे. मॅनेजिंग एजंटांस ३० लक्ष रुपये कमिशन मिळालें. मागीदारांस १२% डिव्हिडंड देण्यास ९½ लक्ष रुपये लागले. कंपनीचें वसूल भांडवल ७७ लक्ष रुपये आहे व तिचा रिझर्व्ह फंड ८४ लक्ष रुपये आहे. आगपेट्यांच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण करावें, ह्या मागणीचें रहस्य वरील आंकड्यांवरून लक्षांत येईल. हिंदुस्थानांतील आगपेट्यांचा धंदा ८०% ते ८५% स्वीडिश हितसंबंधीयांच्या हातीं आहे आणि ह्या कंपन्यांना हिंदुस्थान सरकारच्या संरक्षक धोरणाचा उत्तम फायदा मिळतो. हिंदी मालकीच्या कारखान्यांस ह्या बलवान कंपन्यांची स्पर्धा जाचक व मारक होते, अशी फार पूर्वीपासूनची तक्रार आहे.

## स्फुट विचार

### चलनविस्तार

युद्धखर्च आणि नागरी उपयोगाच्या जिनसांचा तुटवडा ह्यामुळें सर्वच देशांत चलनविस्तार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. डिसेंबर १९३९ च्या मानानें ऑक्टोबर १९४५ मध्यें खेळत्या चलनी नोटांत झालेली तुलनात्मक वाढ पाहिली तर खालील-प्रमाणें आंकडे मिळतात:—

| | खेळत्या नोटांत वाढ (%) |
|---|---|
| हंगेरी | १०,२६८ |
| युगोस्लाव्हिया | १,७९७ |
| इटली | १,०६६ |
| झेकोस्लोव्हाकिया | ५२६ |
| हिंदुस्थान | ४१९ |
| कॅनडा | ३०४ |
| अमेरिका | २६८ |
| फ्रान्स | २४९ |
| ब्राझील | २४१ |
| बेल्जम | १३७ |
| ग्रेट ब्रिटन | १३४ |
| स्वीडन व स्वित्सरलंड | ८० |

वरील तक्त्यांत चीनमधील चलनविस्ताराचें प्रमाण आलेलें नाहीं, परंतु तेथील चलनामधील भरमसाट वाढ सुप्रसिद्धच आहे. अमेरिकेंत देण्याघेण्याचें प्रमुख साधन चलनी नोटा हें नसून चेक हेंच आहे, परंतु चलनाच्या मानानें बँकांतील ठेवी वाढलेल्या नाहींत. ग्रेट ब्रिटन, अमेरिका, कॅनडा इत्यादि देशांपेक्षा हिंदुस्थानांतील चलनविस्तार कितीतरी जास्त आहे.

### हिंदुस्थानांतील पेट्रोलचें उत्पादन

हिंदुस्थानांतील पेट्रोलचें उत्पादन कोणाच्याच डोळयावर येण्यासारखें नाहीं. कारण जगांतील पेट्रोलच्या एकंदर उत्पादनां-पैकी जेमतेम शेंकडा ½ टक्के उत्पादन हिंदुस्थानांत होतें. परंतु याचें खरें कारण असें आहे कीं, हिंदुस्थानांतील उपलब्ध असलेल्या पेट्रोलच्या खाणी भरपूर प्रमाणांत चालविल्याच जात नाहींत. हिंदुस्थानांत पेट्रोलच्या व नैसर्गिक ज्वलत् वायूच्या खाणी आहेत व त्यांचेपासून किफायतशीर प्रमाणावर उत्पादन करणें शक्य आहे असें आपलें मत श्री. अबदुल के. मेहेता नामक भूगर्भविशारदानें जाहीर केलें आहे. श्री. मेहेता यांच्या मताने बलुचिस्थान, वायव्य सरहद्द प्रांत, पंजाब, सिंध, बिहार, बंगाल व असाम आणि सिंधूची व गंगेची खेडीं हीं पेट्रोल व ज्वलत्वायू यांनी चांगलीं समृद्ध आहेत. राजपुतांना, कच्छ व मद्रासचे जवळपासचा प्रदेश यांतसुद्धां खाणी चालवून पहाणें मेहेता यांना आवश्यक वाटतें. आधुनिक शास्त्रीय साधनांनीं भूगर्भातील खनिज संपत्तीचा खोलपर्यंत शोध घेणें शक्य व सुलभ झालें आहे. तेव्हां सरकारने एक स्वतंत्र खातें काढून देशांतील पेट्रोल व ज्वलत् वायूच्या विभागांची पहाणी करावी. ज्या भागांत व संस्थानांत या पदार्थांचा शोध लागणें शक्य आहे त्यांनींहि या पहाणीचे कामीं हातभार लावावा व शक्य तर मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक व संस्थानी अधिकारी यांच्या सहकार्यानें हें कार्य व्हावें अशी श्री. मेहेता यांची सूचना असून या कामीं सरकारकडून आर्थिक सहाय्य व्हावें व आवश्यक ते कायदे विधिमंडळाकडून संमत करून घेतले जावेत अशी त्यांची मागणी आहे.

### केळयांचा व्यापार

हिंदुस्थानांत सन १९४०-४१ सालीं ४,०४,५५० एकर जमिनींत केळींची लागवड होती. केळयांचें पीक मुख्यतः मद्रास, बंगाल, मुंबई, आसाम व बिहार भागांत होतें. त्रावणकोर व म्हैसूर या संस्थानांतहि केळयांच्या बागा आहेत. परंतु हिंदुस्थानांतून केळयांची निर्यात फारच अल्प प्रमाणांत होते. १९३७ ते ४० या तीन सालांत मिळून ५७,८०६ रुपये किंमतीचीं १२९९३ मण केळीं परदेशीं पाठविलीं गेलीं. युद्धाच्या काळांत ही निर्यात खात्रीनें बरीच वाढली असावी. केळयांच्या निरनिराळ्या अनेक जाती आहेत व रुचीप्रमाणें निरनिराळ्या आवडीच्या लोकांत निरनिराळ्या जातींचीं केळीं प्रिय आहेत. लांब पल्ल्याच्या प्रवासास केळीं उपयोगाचीं नाहींत, परंतु वहातुकीच्या चांगल्या सोयी, शीतरक्षणाची (Cold Storage) व्यवस्था वगैरे बाबतींकडे लक्ष देऊन केळयांच्या शेतीची शास्त्रीय पद्धतीवर मांडणी केली आणि चांगल्या जातिवंत केळयांची खानगी त्या त्या जातीच्या चाहत्या बाजारांची माहिती जमा करून तेथें केली तर हिंदुस्थानांत केळयांचा मोठा धंदा सहज पुकारला जाईल अशा सूचना हिंदुस्थान सरकारकडे शेतकी बाजारांच्या सल्लागार अधिकाऱ्यांनीं पाठविल्या आहेत.

### लंडनमधील सोन्या-चांदीची किंमत चढणार ?

न्यूयॉर्क व लंडन येथील सोन्या-चांदीची किंमत युरोप, मध्य पूर्व, हिंदुस्थान, इत्यादि ठिकाणच्या मानानें पुष्कळच कमी आहे. ह्या किंमती एका पातळीवर येण्याचे दोन मार्ग आहेत: लंडन-न्यूयॉर्कमधील किंमती चढल्या पाहिजेत किंवा इतर ठिकाणच्या किंमती उतरल्या पाहिजेत. अमेरिकेनें सोन्याची ठरविलेली किंमत औंसास ३५ डॉलर्स इतकी आहे, आणि पौंड-डॉलर हुंडणावळ ठरविलेली आहे, तेव्हा तेथील सोन्याचा भाव स्टर्लिंग पौंड व डॉलर ह्या दोघांच्याहि किंमती उतरविल्याविना कसा चढणार ? परंतु चांदीचे बाबतींत मात्र तेथील किंमती इतर ठिकाणच्या किंमतीचे बरोबर येण्याचा मार्गावर आहेत, असें दिसतें. लंडनमधील सोन्या-चांदीच्या व्यापारी क्षेत्रांत वहाणाऱ्या वाऱ्यांपासून हा बोध निघतो.

### दि बँक ऑफ जयपूर लि.

५० लक्ष रुपये वसूल भांडवल, २१½ लक्ष रुपये रिझर्व्ह फंड, सुमारें ७ कोटि रुपये ठेवी, बिलें व अक्सेप्टन्सेस ३४ लक्ष रुपये, एकूण ८ कोटि १० लक्ष रुपये अशी रकम वरील बँकेच्या ताळेबंदांत देणें बाजूस आहे. बँकेनें २ कोटि, १५ लक्ष रुपये रोख्यांत गुंतवले असून ३ कोटि, ४१ लक्ष रुपये कर्जाऊ दिले आहेत. ५१ लखांचीं बिलें डिस्कौंट केलीं आहेत अथवा विकत घेतलीं आहेत. बँकेस १९४५ सालीं निव्वळ नफा ४,६८,८५८ रुपये झाला. रिझर्व्ह फंडांत २१ लक्ष रुपये टाकण्यांत आले व १ लक्ष, ४८ हजार रुपये पुढील हिशेबांत ओढण्यांत आले. बँकेच्या मजबुतीच्या वाढीकडे अशा रीतीनें प्राधान्य देण्यांत आलें आहे. बँकेच्या हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं २५ शाखा आहेत. श्री. एस. एल. कोठारी, बी. ए., बी. कॉम. (लंडन), ए.सी. ए., हे बँकेचे मॅनेजर आहेत.

### बँकांचें एकीकरण

न्यू स्टँडर्ड बँक लि. व कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन लि. ह्या बंगाली शेड्यूल्ड बँकांचें एकत्रीकरण होणार आहे. ह्या बँका कित्येक वर्षे एकमेकींच्या एजंट्स म्हणून काम करीत होत्या. एकत्रीकरणाची योजना इंडियन कंपनीज ॲक्टाच्या २०८ क कलमाप्रमाणें आखण्यांत आली आहे. न्यू स्टँडर्ड बँकेच्या प्रत्येक भागीदारास कॉमिल्ला बँकेचे भागीदार होतां येईल आणि न्यू स्टँडर्डच्या प्रत्येक दोन भागांचे जागीं कॉमिल्लाचा एक भाग त्यास मिळेल. ह्या नव्या भागीदारांस एन. एस. असें म्हटलें जाईल व त्यांस कॉमिल्लाच्या नफा वाटणींत १९४८ अखेर ५% कर माफ डिव्हिडंट मिळेल. कॉमिल्लाचा ७% दर वाढला, तर एन. एस. चाहि दर वाढेल, परंतु दोहोंत २% तफावत राहील. १९४९ पासून मात्र दोन्ही शेअर्स डिव्हिडंड वाटणीचे बाबतींत समान गणले जातील. न्यू स्टँडर्ड बँकेच्या एखाद्या भागीदारांस कॉमिल्ला बँकेचे भागीदार व्हावयाचें नसल्यास २०८ क कलमाप्रमाणे योग्य नोटिशीनंतर त्यास त्याच्या भागाची किंमत देऊन टाकण्यांत येईल. न्यू स्टँडर्ड बँकेचा नोकरवर्ग कॉमिल्ला बँकेंत वर्ग होईल आणि त्यांच्या नोकरींत खंड न पडतां त्यांस पगार वाढ होत राहील. न्यू स्टँडर्ड बँकेचे डायरेक्टर कॉमिल्ला बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर जातील. वरीलप्रमाणें एकत्रीकरण घडवून आणण्यासाठी न्यू स्टँडर्ड बँकेचें " व्हालंटरी वायंडिंग अप " करावें लागेल त्याकरितां आवश्यक ते ठराव भागीदारांच्या खास सभेंत करावे लागतील. २५ रोजीं अशी खास सभा बोलावण्यांत आली आहे. दोन मोठ्या बँकांचें खुषीनें एकत्रीकरण होत आहे, ही गोष्ट बँकिंग क्षेत्रांत स्वागतार्हच समजली पाहिजे. ह्या दोन्ही बँका एकत्रित झाल्यावर त्यांचें वसूल भांडवल ७६ लक्ष रुपये होईल. रिझर्व्ह ३० लाखांवर जातील व ठेवींची रकम १३½ कोटि रुपये भरेल.

---

### सार्वत्रिक दुष्काळ जवळ आला !

हिंदुस्थानकडे धान्य पाठविण्याचें कंबाईंड फूड बोर्डाने मान्य केलें, परंतु तो आपला शब्द पाळीत नाहीं, असें हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्री, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं जाहीर केलें आहे. हिंदुस्थानास देऊं केलेलें धान्य हातीं येऊं शकत नाहीं अशी परिस्थिति आहे. ब्रिटिश सरकार, अमेरिकन सरकार आणि कंबाईंड फूड बोर्ड ह्यांचेमध्यें वाटाघाटी होऊन, हिंदुस्थानास १९४६ च्या पहिल्या सहामाहींत मिळावयाचें धान्य निश्चित झालें, त्याची वॉशिंग्टन व लंडन येथें घोषणा झाली, हिंदुस्थानांत त्यास प्रसिद्धी देण्यास हरकत नाहीं असें हिंदी प्रतिनिधींस सांगण्यांत आलें आणि धान्य मात्र येत नाहीं! "धान्याच्या आयातीस आगबोटींचा तुटवडा नाहीं, ते आम्हांस धान्य देत नाहींत ह्याखेरीज दुसरें कांहीं नाहीं." असे उद्गार सर ज्वालाप्रसाद ह्यांनी काढून आपली असहायता प्रकट केली आहे. हिंदुस्थानास त्याच्या मागणीप्रमाणें धान्य मिळालें नाहीं तर जुलैच्या सुमारास दुष्काळ चांगलाच जाणवूं लागेल आणि सर्वांनाच तो भोगावा लागेल अशी भीषण परिस्थिति आहे.

---

### हिंदी साखरेचें उत्पादन

| वर्ष | टन |
|---|---|
| १९४४–४५ | ९,५३,५०० |
| १९४५–४६ | ९,६६,००० |

**पेनिसिलिन**— हिंदुस्थानांतील इस्पितळांत वांटण्यासाठी सुमारें १५ हजार रुपये किंमतीचें पेनिसिलिन लंडनहून निघालें आहे. मर्कंटाईल बँक ऑफ इंडियाचे मार्फत तें येथें उतरेल.

**युद्धांत नष्ट झालेल्या युद्धनौका**—गेल्या महायुद्धांत एकूण १२७२ जर्मन व इटालियन युद्धनौकांचा नाश करण्यांत आला व २०४ जर्मन व ४९ इटालिअन नौका शरण आल्या त्या वेगळया. वरील १,२७२ युद्धनौकांत ९९४ जर्मन व ११६ इटालिअन पाणबुड्यांचा समावेश होतो.

त्यांची वेळीच काळजी घ्या!

परंपरा व आधुनिक वैद्यक या दोहोंचे दृष्टीनें उपयुक्त ठरलेलें, अंगकांति मृदु व तेजस्वी करणारें आणि हाडें मजबूत करून शक्ति व वजन वाढविणारें......


दि सूर्यकिरण फार्मसी लि.
SK 7 NINAD LTD.
महाराष्ट्र एजन्सी :
मेसर्स जयप्रकाश आणि कं.
२२५१४, सदाशिव, पुणें.

विम्याचें महत्त्व आपणांस पटलें आहे ना?
मग अल्पावधींत लोकांच्या विश्वासास पात्र झालेल्या
दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनीची
आपल्याला पसंत असलेली पॉलिसी घ्या
सढळ अटीवर सर्वत्र एजंट नेमणें आहेत.
—जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा—
मॅनेजर,
दि सुप्रीम म्यु. अ. कं. लि. पुणें
८६६ सदाशिव पेठ, पुणें शहर

# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद

-इंडि. युना. मिल्स ३-५-४६ ते ३१-५-४६

व्याज-वजा

+ नागपूर रु. ५ दि. ३०-४-४६
स्वदेशी रु. २२ दि. १५-५-४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

इंडि. यु. ऑ. ०-१५-० दि. १०-६-४५
इंडि. यु. डि. ०-३-० दि. १०-६-४५

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ३०।४।४६ | बुधवार १।५।४६ | गुरुवार २।५।४६ | शुक्रवार ३।५।४६ | सोमवार ६।५।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २९६६—४ | ३००१—० | ३०२३-१२ | २९५५—० | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५२४—८ | ५२८—० | ५३०—० | ५२१—० | |
| २२२२-८; १७६२-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २४४०—० | २४५१—४ | २४७०—० | २४०५—० | |
| ७०२; ५६६ | १९——० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९४२—० | ९५०—० | ९६०—० | ९२२—० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८२५—० | ८१६—० | ८२४—० | ८००—० | |
| ४४३-८; ३६० | ५-०-० † | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४९८—०+ | ४९३—० | ५०२—० | ४८५—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४३२—० | ४३५—० | ४३९—० | ४२०—० | |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३८२—० | ३८५—० | ३९५—८ | ३७९—० | |
| ३३७; २४३ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४३०—० | ४२६—० | ४२६—० | ४१३—० | —बाजार बंद— |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—८ | ५—७ | ५—७ | ५—६ | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२-१३ | २२-११-६ | २२-११ | २१-११ | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४—४—६ | ४—४—६ | ४—४ | ४—३—९ | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९३८-१२ | ९२०—० | ९१७—८ | ९१०—० | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २५३—८ | २५४—० | २५३-१२ | २५२—४ | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३०५—० | ३०४—० | ३०४—८ | २९३—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६६०—० | ६६२—८ | ६६२—८ | ६५५—० | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३—९ | ४३—८ | ४३—६ | ४२—४ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२-१३-६ | १०२-१३ | १०२-१२-६ | १०२-१२ ६ | |

सोमवार दि. ६।५।४६ ला भुलाभाई देसाई यांच्या दुःखद निधनानिमित्त बाजार बंद होता.

### इंडिया युनायटेड मिल्स लि.

२,४४,४२४ चात्या व ६,६७२ माग ह्यांच्या पांच गिरण्या व डायवर्क्स ह्यांची मालकी असलेल्या इंडिया युनायटेड मिल्स, लि. ला १९४५ सालीं २ कोटि, ६ लाख रुपये नफा झाला. त्यापैकीं भागीदारांच्या वाट्यास फक्त २८ लक्ष रुपये येणार आहेत. "कापड व सूत ह्यांच्या विक्रीच्या किमतींत सरकारनें कपात करण्याचें धोरण चालू ठेवलें, परंतु त्यामानानें उत्पादन खर्च कमी झाला नाहीं. त्याचा कंपनीच्या नफ्यावर परिणाम स्वाभाविकपणें च झाला." कंपनीचा नफा (४,१०,००,००० रु.) व स्टँडिंग चार्जेस (१,१२,२५०,००० रु.) ह्यांचा दोन वर्षांकरितां कंसांतील रकमेचा विमा उतरविण्यांत आला आहे. कंपनीच्या मॅनेजिंग एजंटांना अहवालाचे वर्षी १६३ लक्ष रुपये कमिशन मिळालें. डायरेक्टरच्या फीचा खर्च फक्त ११,८५० रुपये आहे.

**हातकागदाच्या उत्पादनांत वाढ**—मुंबई प्रांताचे अर्थ-मंत्रि, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांचें हातकागदाच्या उत्पादनाचे बाबतींत पूर्वीपासून लक्ष आहे. हातकागदाच्या उत्पादनाचीं केंद्रें स्थापून पुढें तीं सहकारी संस्थांकडे सोपविण्याची ते योजना आखीत आहेत असें समजतें.

# NOTICE.

Reserve Bank of India
Central Office,
Bombay.
25th, April 1946.

It is hereby notified that the Share Registers of the Bank will be closed and the registration of transfers suspended from the 7th June 1946 to the 29th June 1946 ( both days inclusive ).

C. D. DESHMUKH,
Governor

—दररोज वापरण्यासाठीं लागणारें—
**लोणी आणि चक्का**
खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील
—प्रमुख ठिकाण—
बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## पूना कमर्शिअल हायस्कूल

सरकारमान्य असलेला व्यावहारिक व उपयुक्त असा एस. एल. सी. परीक्षेचा कोर्स. परीक्षा पास झाल्यावर कॉमर्स कॉलेजांत निश्चित प्रवेश. देशी व इंग्रजी पद्धतीचा जमाखर्च, टाईपरायटिंग, शॉर्ट हँड इत्यादि विषय.

व्यापारी वर्गाचे व धंदेवाईक वर्गाचे विद्यार्थ्यांसाठीं तसेंच इतरही विद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगी असा अभ्यासक्रम. इंग्रजी ३ री पास झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश.

—विशेष माहितीसाठीं समक्ष भेटावें—

वर्ग जूनपासून सुरू होतील

पत्ता:—२५७ क, बुधवार पेठ, डॉ. भिडे यांचा वाडा.

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचें ऑफिस




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.





ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

# ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८

## पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

## बिनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत:





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.